आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२२ मार्च २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात हॉटेलं, उपाहारगृहांसाठी उद्यापासून आणखी २० टक्के गॅस पुरवठा होणार

- पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं संरक्षण, आणि जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्व वचनबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- आगामी काळात 'ग्लोबल साऊथ'मधल्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या तंत्रज्ञानविषयक गरजा भारत पूर्ण करेल, असा केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा विश्वास

- पुण्यभूषण फौंडेशनतर्फे दिला जाणारा पुण्यभूषण पुरस्कार यंदा जेष्ठ उद्योगपती अभय फिरोदिया यांना जाहीर

**आणि**

- इंडियन ओपन स्क्वॉश स्पर्धेत महिला एकेरीच्या विजेतेपदासाठी अनाहत सिंगची लढत सुरु/ पुरुष गटात भारताचं विजेतेपद निश्चित

**<><><><><>**

राज्यातली हॉटेल्स, उपाहारगृहांसाठी उद्यापासून २० टक्के अतिरिक्त गॅस पुरवठा होणार असल्याची माहिती अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. राज्यातली हॉटेल्स, ढाबे, उपहारगृहं, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया-दुग्धव्यवसाय, राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालवण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स यांचा यात समावेश आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने या संदर्भातली सूचना काल जाहीर केली होती. यापूर्वी राज्याला ३० टक्के वाटप मंजूर करण्यात आलं होतं. उद्यापासून पुढचा आदेश येईपर्यंत पुरवठ्यात आणखी २० टक्के वाढ केली जाणार आहे. तसंच, राज्यातल्या केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. प्रलंबित परवान्यांचं नूतनीकरण झाल्याचं मानलं जाईल आणि त्यासाठी कोणतंही शुल्क आकारलं जाणार नाही, असंही भुजबळ यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

पाण्याच्या प्रत्येक थेंबाचं रक्षण आणि त्याचा जबाबदारीनं वापर करण्यासाठी आपण सर्वजण वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पाणी जीवनाचा आधार असून पृथ्वीच्या भविष्याचा आकार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आंतरराष्ट्रीय जल दिनाच्या निमित्तानं दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्र संघानं देखील या निमित्तानं पाणी आणि लिंग समानता या अनुषंगानं ‘जिथे पाणी वाहतं तिथं समानता वाढते’ ही संकल्पना मांडली असून जल व्यवस्थापनातली महिलांची महत्वपूर्ण भूमिका आणि पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे त्यांच्यावर होणारा परिणाम तसंच त्याबाबतच्या निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग अधोरेखित केला आहे.

<><><><>

आगामी काळात भारत 'ग्लोबल साऊथ' मधल्या सर्व उदयोन्मुख अर्थव्यवस्थांच्या तंत्रज्ञानविषयक गरजा पूर्ण करेल, असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. ते आज आयआयटी मुंबई मध्ये आयोजित 'भारत इनोव्हेट्स डीप-टेक प्री-समिट २०२६' च्या समारोप समारंभात बोलत होते. येत्या दशकात भारत 'डीप-टेक' क्षेत्रात जगाचं नेतृत्व करेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या परिषदेत प्रदर्शित करण्यात आलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची त्यांनी यावेळी प्रशंसा केली. २०४७ पर्यंत 'विकसित भारताचं’ उद्दिष्ट साध्य करण्याची जबाबदारी शिक्षण, उद्योग, अर्थ क्षेत्र आणि देशातल्या तरुणांची आहे, असं ते म्हणाले.

‘भारत इनोव्हेट्स २०२६’, हा भारताच्या तंत्रज्ञानविषयक भविष्याचा निर्णायक टप्पा ठरेल, असा विश्वास इस्रोचे माजी अध्यक्ष आणि आयआयटी मुंबईच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. के. राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला.

या दोन दिवसीय कार्यक्रमात १३७ स्टार्ट-अप्सनी भाग घेतला असून, त्यांनी सुमारे २०० गुंतवणूकदार आणि ८० कॉर्पोरेट्सशी संवाद साधल्याची माहिती आयआयटी मुंबईचे संचालक शिरीष केदारे यांनी दिली.

<><><><>

निसर्गोपचार ही शाखा निसर्गाशी सुसंवाद राखायला प्रोत्साहन देते, असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. पुण्यात उरळी कांचन इथल्या निसर्गोपचार केंद्राच्या ८१व्या

वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आज प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पारंपरिक भारतीय उपचार पद्धती सध्याच्या काळाशी अधिक समर्पक असल्याचं ते म्हणाले.

या कार्यक्रमाला राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश सिंग, राज्यपाल जिष्णु देव वर्मा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते. प्रत्येकानं आपल्या दैनंदिन जीवनात निसर्गोपचाराचा अधिकाधिक वापर करावा असं आवाहन सुनेत्रा पवार यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेला नाशिकमधला भोंदूबाबा अशोक खरात याच्यावर आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. अशोक खरातने आपलं लैंगिक शोषण केल्याची तसंच ईशान्येश्वर मंदिर संस्थानासाठी पैसे घेतल्याची तक्रार एका महिलेनं केली आहे. याप्रकरणी नाशिकमधल्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

**<><><><>**

पुण्यभूषण फौंडेशनतर्फे दिला जाणारा पुण्यभूषण पुरस्कार यंदा जेष्ठ उद्योगपती अभय फिरोदिया यांना जाहीर झाला आहे. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर सतीश देसाई यांनी आज प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही घोषणा केली. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालच्या निवड समितीनं उद्योगपती अभय फिरोदिया यांचं नाव या पुरस्कारासाठी निश्चित केलं. बालशिवाजींची, सोन्याच्या फाळानं पुण्याची भूमी नांगरत असलेली प्रतिकृती, पुण्यनगरीच्या ग्रामदैवतांची प्रतिमा असलेलं स्मृतिचिन्ह आणि दोन लाख रूपये, असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**<><><><>**

इंडियन ओपन २०२६ स्क्वॉश स्पर्धेत महिला एकेरीच्या विजेतेपदासाठी भारताची अनाहत सिंग हिचा सामना इजिप्तच्या हाना मोताझ हिच्याशी मुंबईत ब्रेबॉर्न स्टेडिअम इथं सुरू आहे. तर पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात आज अभय सिंग आणि वीर चोत्रानी या दोन्ही भारतीय खेळाडूंमध्येच लढत होणार आहे. त्यामुळे भारताचं विजेतेपद निश्चित झालं आहे.

**<><><><>**

भारतीय शेतकरी, ऊर्जा आणि इंधन निर्मितीसाठी सक्षम असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत एका कार्यक्रमात बोलत होते. इंडियन ऑईल

आणि भारत सरकार एकत्रितपणे एक लाख लिटर इथेनॉल, दीडशे टन बाय बिटुमन आणि ७८ हजार टन विमानाचं इंधन तयार करत असल्याचं त्यांनी सांगितलं. बायटेक्नॉलॉजीचा वापर केल्यामुळे डिझेलच्या आयातीवरचं अवलंबित्व कमी होईल, आणि आपला शेतकरी केवळ अन्नदाताच नाही तर उर्जादाताही होईल, अस ते म्हणाले….

**- -होल्ड - बाईट - -**

**<><><><><>**

एपस्टिन फाईल प्रकरणी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी उद्या संयुक्तपणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूरमधल्या मुख्यालयावर मोर्चा काढणार आहे. नागपुरातल्या संविधान चौक ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सत्तेतले ८ हजार ९३१ दिवस पूर्ण केले असून भारतीय राजकारणात ते सर्वाधिक काळ सत्तेत असलेले नेते ठरले आहेत. त्यांनी सिक्कीमचे मुख्यमंत्री पवन चामलिंग यांना मागे टाकलं आहे. गुजरातचे मुख्यमंत्री आणि देशाचे प्रधानमंत्री म्हणून मोदी यानी सत्तेत २५ वर्षं पूर्ण केली आहेत.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी याबद्दल प्रधानमंत्र्यांचं अभिनंदन केलं आहे. प्रधानमंत्र्यांचं जीवन ही एक सेवा यात्रा असून अतूट बांधिलकी आणि समर्पित नेतृत्त्वाचं मूर्तिमंत उदाहरण आहे, असं राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. तर प्रधानमंत्र्यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे आणि देशासाठी देखील हा एक अभिमानाचा क्षण आहे, असं नड्डा यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आर्थिक घोटाळा प्रकरणी सहभाग असल्याच्या आरोपावरून सीबीआयनं उद्योगपती अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कमर्शियल फायनान्स या कंपनीची चौकशी सुरु केली आहे. त्याअंतर्गत आज सीबीआयनं ऑथम इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या सल्लागाराची चौकशी केली. या कंपनीनं रिलायन्स कमर्शियल फायनान्स आणि रिलायन्स होम फायनान्स

या सध्या चौकशी सुरु असलेल्या दोन कंपन्यांची मालमत्ता खरेदी केल्याचा सीबीआयचा आरोप आहे. बँक ऑफ महाराष्ट्रनं गेल्या वर्षी यासंदर्भात तक्रार दाखल केली होती.

याशिवाय सीबीआयनं हजारो कोटी रुपयांच्या एका मोठ्या बँक घोटाळा प्रकरणात रिलायन्स एडीए ग्रुपच्या अधिकाऱ्यांची चौकशी केली. स्टेट बँक ऑफ इंडियानं केलेल्या तक्रारीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**<><><><><>**

रशियाहून कच्चं तेल घेऊन येणारं ॲक्वा टायटन हे जहाज आज कर्नाटकात मंगळुरु इथल्या बंदरात पोहोचलं. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे जगभरात वाढलेल्या इंधनाच्या किमती स्थिर करण्याच्या उद्देशानं अमेरिकेनं समुद्रात उभ्या असलेल्या रशियाच्या तेलवाहू जहाजांना पुढे जाण्याची परवानगी दिल्यानंतर हे जहाज भारतात आलं आहे. याशिवाय अमेरिकेहून एलपीजी घेऊन येणारं एक मालवाहू जहाज देखील मंगळुरु इथं पोहोचलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात उद्या तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामान राहील तर विदर्भात हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**